केंद्र पुरस्कृत योजनांसाठी सिंगल नोडल एजन्सी (SNA) खात्यावरील राज्य हिश्श्याच्या अखर्चित रकमेवरील व्याज व इतर जमा रकमा यासाठी लेखाशीर्षांच्या मान्यतेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. एफडीएम-२०२२/प्र.क्र.७९/फ-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक :- २८ मार्च, २०२३

संदर्भ:-

१. केंद्रीय वित्त मंत्रालयाचे कार्यालयीन ज्ञापन क्र. F.No.१(१३)PFMS/FCD/२०२१ दि. ३०.६.२०२१, दि.१५.०७.२०२२

२. वित्त विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०२२/ प्र. क्र. ०९/साधनसंपत्ती दि.०७.०६.२०२२.

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या संदर्भ १ येथील कार्यालयीन ज्ञापनांद्वारे प्राप्त मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन वित्त विभागाने संदर्भ २ येथील पत्रान्वये सर्व प्रशासकीय विभागांना केंद्र पुरस्कृत योजनांच्या अखर्चित रक्कमेवरील व्याजासाठी विभागाशी संबंधित कार्यात्मक प्रधानशीर्ष/उपशीर्ष याखालील ८०१-व्याज किंवा प्राप्त अनुदानातील अखर्चित रक्कमेवरील व्याज या गौणशीर्षाखाली १. व्याज व २. इतर रक्कमा हे स्वतंत्र शीर्ष उघडण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत सूचित केले आहे.

२. वन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व केंद्र पुरस्कृत योजनांच्या सिंगल नोडल एजन्सी (SNA) खात्यामध्ये अखर्चित राहणाऱ्या निधीवरील राज्य हिश्श्याचे व्याज व इतर जमा रकमा करण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्षास मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याकरीता पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

वन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व केंद्र पुरस्कृत योजनांच्या सिंगल नोडल एजन्सी (SNA) खात्यामध्ये अखर्चित राहणाऱ्या निधीवरील राज्य हिश्श्याचे व्याज व इतर जमा रक्कमा जमा करण्यासाठी खालील लेखाशीर्षास मान्यता प्रदान करण्यात आहे.अ)

| लेखाशीर्ष (इंग्रजी) :- | लेखाशीर्ष (मराठी) :- |
|---|---|
| Major Head :- 0406-Forestry and Wild Life | प्रधान लेखाशीर्ष :- ०४०६ - वनीकरण व वन्यजीव |
| Sub Major Head :- 01-Forestry | उप प्रधान लेखाशीर्ष :- ०१- वनीकरण |
| Minor Head :- 801 - Interest or other earnings from grantee on unspent balances | गौण शीर्ष :- ८०१- अनुदानग्राहीकडून अखर्चित शिलकींवरील व्याज किंवा इतर जमा रकमा |
| Group Head :- 01- Interest | गट शीर्ष :- ०१- व्याज |
| Sub Group Head :- (01) (01)<br>**Interest on unspent balances in Single Nodal Account (Revenue and Forest Department)**<br>**CRC: 0406027201** | उप गट शीर्ष :- (०१) (०१)<br>**सिंगल नोडल खात्यावरील अखर्चित शिलकींवरील व्याज (महसुल व वन विभाग)**<br>**संकेतांक: ०४०६०२७२०१** |

ब)

| **लेखाशीर्ष (इंग्रजी) :-** | **लेखाशीर्ष (मराठी) :-** |
|---|---|
| Major Head :- 0406-Forestry and Wild Life | प्रधान लेखाशीर्ष :- ०४०६ - वनीकरण व वन्यजीव |
| Sub Major Head :- 01-Forestry | उप प्रधान लेखाशीर्ष :- ०१- वनीकरण |
| Minor Head :- 801 - Interest or other earnings from grantee on unspent balances | गौण शीर्ष :- ८०१- अनुदानग्राहीकडून अखर्चित शिलकींवरील व्याज किंवा इतर जमा रकमा |
| Group Head :- (02)- Other Earnings | गट शीर्ष :- ०२- इतर जमा रकमा |
| Sub Group Head :- (02) (01)<br>**Other Earnings in Single Nodal Account (Revenue and Forest Department)**<br>**CRC:0406028101** | उप गट शीर्ष :- (०२) (०१)<br>**सिंगल नोडल खात्यातील इतर जमा रकमा (महसुल व वन विभाग)**<br>**संकेतांक: ०४०६०२८१०१** |

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व महालेखापाल कार्यालय, मुंबई यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सं.ख.वि/चा-१/ महसुल व वन विभाग./यूऔआर-१७२/२०२२-२३/९६१ दि.०९/०२/२०२३ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३०३२८१४३५३५९३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PINGALE BHANUDAS NARAYAN

Digitally signed by PINGALE BHANUDAS NARAYAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=cd9b7c852f06815dc15baee9beaa952cb59250169fcb3d48915 0789e0cc31ca6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=6025E577A0EE54FAED5D6081093A5E1F8E2B15125A14 DDE66E1EA3AFA9BC2CF5, cn=PINGALE BHANUDAS NARAYAN
Date: 2023.03.28 14:41:00 +05'30'

**( डॉ. भानुदास पिंगळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (वने), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/उप सचिव (वने) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई.
७. अर्थ-६ कार्यासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
९. ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.